जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 NOV 2026 वर्तमान

विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद हाच रानडे यांच्या प्रबोधनाचा संदेश: कुलगुरू



कोल्हापूर/प्रतिनिधी :

विचारांमधील मतभेद समाजाच्या प्रबोधनासाठी आवश्यक असले, तरी त्यातून मनभेद निर्माण होऊ नयेत. विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद कायम ठेवणे, हीच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची खरी ताकद असून आजच्या काळात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा हा विचार अधिक समर्पक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'न्या. महादेव गोविंद रानडे: काळ आणि कर्तृत्व' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ आणि अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीरज हातेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, रानडे यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचा काळ समजून घेणे आवश्यक आहे. रानडे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मोठेपण केवळ त्यांनी भूषविलेल्या पदांमध्ये नसून त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये आहे. विधवा पुनर्विवाह मंडळ, पुणे सार्वजनिक सभा, प्रार्थना समाज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रीय सामाजिक परिषद यांसारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. व्यक्ती येतात आणि जातात; मात्र संस्था विचारांना दीर्घायुष्य देतात, असा त्यांचा विश्वास होता. संस्था उभारण्यावरोबरच त्यांनी नेतृत्वही घडविले. त्यांचे शिष्य गोपाळकृष्ण गोखले यांना महात्मा गांधी यांनी आपले राजकीय गुरू मानले, तर प्रार्थना समाजाच्या विचारपरंपरेतून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य पुढे नेले. त्यामुळे रानडे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर समाजसुधारक घडविणारे मार्गदर्शक होते, असे डॉ. कामत यांनी नमूद केले.

'छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा लोकशक्तीचा उदय'

रानडे यांच्या इतिहासविषयक दृष्टिकोनाचा संदर्भ देताना ते म्हणाले की, परकीय इतिहासकार मराठ्यांच्या उदयाकडे प्रामुख्याने लष्करी विजयाच्या दृष्टिकोनातून पाहत होते. मात्र, रानडे यांनी 'Rise of the Maratha Power' या ग्रंथातून छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ एका राजसत्तेचा किंवा लष्करी शक्तीचा उदय नसून तो लोकशक्तीचा उदय असल्याचे अधोरेखित केले. या भूमीची वैचारिक आणि आध्यात्मिक जडणघडण संतपरंपरेने आधीच केली होती, हा विचारही त्यांनी मांडला.

रानडे यांचे अर्थविषयक विचारही काळाच्या पुढचे होते. 'भारतीय अर्थशास्त्रावरील निबंध' या १८९८ मधील ग्रंथात त्यांनी अर्थशास्त्राचे नियम सर्व देशांना एकाच पद्धतीने लागू होऊ शकत नाहीत, हे स्पष्ट केले. परदेशातील आर्थिक प्रारूपे जशीच्या तशी स्वीकारण्याऐवजी भारताच्या परिस्थितीला अनुरूप आर्थिक प्रारूप विकसित करण्याची गरज त्यांनी मांडली, असेही कुलगुरूंनी सांगितले.

'व्याख्यानांचे पुस्तक व्हावे'

या दोन दिवसीय कार्यशाळेत होणारे विचारमंथन केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता त्याचे पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशन व्हावे, अशी अपेक्षाही कुलगुरू डॉ. कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सुरवातीला डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय मचाले, उमाकांत हत्तीकट यांच्यासह इतिहास अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

05 NOV 2026
सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद हाच रानडे यांच्या प्रबोधनाचा संदेश: कुलगुरू डॉ. राजनीश कामत



कोल्हापूर/प्रतिनिधी :

विचारांमधील मतभेद समाजाच्या प्रबोधनासाठी आवश्यक असले, तरी त्यातून मनभेद निर्माण होऊ नयेत. विविध विचारप्रवाहांमध्ये संवाद कायम ठेवणे, हीच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेची खरी ताकद असून आजच्या काळात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचा हा विचार अधिक समर्पक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'न्या. महादेव गोविंद रानडे: काळ आणि कर्तृत्व' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ आणि अर्थशास्त्रज्ञ डॉ. नीरज हातेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, रानडे यांचे कर्तृत्व समजून घेण्यासाठी त्यांचा काळ समजून घेणे आवश्यक आहे. रानडे हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे मोठेपण केवळ त्यांनी भूषविलेल्या पदांमध्ये नसून त्यांनी उभारलेल्या संस्थांमध्ये आहे. विधवा पुनर्विवाह मंडळ, पुणे सार्वजनिक सभा, प्रार्थना समाज, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि राष्ट्रीय सामाजिक परिषद यांसारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. व्यक्ती येतात आणि जातात; मात्र संस्था विचारांना दीर्घायुष्य देतात, असा त्यांचा विश्वास होता. संस्था उभारण्याबरोबरच त्यांनी नेतृत्वही घडविले. त्यांचे शिष्य गोपाळकृष्ण गोखले यांना महात्मा गांधी यांनी आपले राजकीय गुरू मानले, तर प्रार्थना समाजाच्या विचारपरंपरेतून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य पुढे नेले. त्यामुळे रानडे हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर समाजसुधारक घडविणारे मार्गदर्शक होते, असे डॉ. कामत यांनी नमूद केले.

'छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा लोकशक्तीचा उदय'

रानडे यांच्या इतिहासविषयक दृष्टिकोनाचा संदर्भ देताना ते म्हणाले की, परकीय इतिहासकार मराठ्यांच्या उदयाकडे प्रामुख्याने लष्करी विजयाच्या दृष्टिकोनातून पाहत होते. मात्र, रानडे यांनी 'Rise of the Maratha Power' या ग्रंथातून छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ एका राजसत्तेचा किंवा लष्करी शक्तीचा उदय नसून तो लोकशक्तीचा उदय असल्याचे अधोरेखित केले. या भूमीची वैचारिक आणि आध्यात्मिक जडणघडण संतपरंपरेने आधीच केली होती, हा विचारही त्यांनी मांडला.

रानडे यांचे अर्थविषयक विचारही काळाच्या पुढचे होते. 'भारतीय अर्थशास्त्रावरील निबंध' या १८९८ मधील ग्रंथात त्यांनी अर्थशास्त्राचे नियम सर्व देशांना एकाच पद्धतीने लागू होऊ शकत नाहीत, हे स्पष्ट केले. परदेशातील आर्थिक प्रारूपे जशीच्या तशी स्वीकारण्याऐवजी भारताच्या परिस्थितीला अनुरूप आर्थिक प्रारूप विकसित करण्याची गरज त्यांनी मांडली, असेही कुलगुरूंनी सांगितले.

'व्याख्यानांचे पुस्तक व्हावे'

या दोन दिवसीय कार्यशाळेत होणारे विचारमंथन केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता त्याचे पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशन व्हावे, अशी अपेक्षाही कुलगुरू डॉ. कामत यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सुरवातीला डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. भारती पाटील, डॉ. अरुण भोसले, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दत्तात्रय मचाले. उमाकांत हत्तीकट यांच्यासह इतिहास अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


05 NOV 2026 जनप्रवास

न्या. रानडेंची अर्थनीती आजही समर्पक : डॉ. नीरज हातेकर यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

भारताच्या आर्थिक विकासासाठी पाश्चात्त्य अर्थशास्त्राची चौकट जशीच्या तशी स्वीकारण्याऐवजी भारतीय परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र आर्थिक धोरण विकसित करण्याची आवश्यकता न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी दीडशे वर्षांपूर्वीच ओळखली होती. देशातील नवोदित उद्योगांचे संरक्षण, औद्योगिकीकरणासाठी शासनाचा सक्रिय सहभाग आणि स्वदेशी उद्योगांना बळ देण्याची त्यांची अर्थनीती आजच्या जागतिक आर्थिक परिस्थितीतही अत्यंत महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरते, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात इतिहास अधिविभागाच्या वतीने आयोजित 'महादेव गोविंद रानडेः काळ आणि कर्तृत्व' या विषयावरील कार्यशाळेत 'न्या. रानडे यांच्या आर्थिक विचारांची समकालीन प्रस्तुतता' या विषयावर



ते बोलत होते.

डॉ. हातेकर म्हणाले, अर्थव्यवस्था ही केवळ बाजारपेठेच्या व्यवहारांमधून किंवा काही तज्ज्ञांच्या निर्णयांमधून घडत नसते, तर समाजातील सत्तासंबंध, स्थानिक गरजा आणि लोकांच्या सहभागातून तिची जडणघडण होत असते. त्यामुळे आर्थिक धोरणे ठरविताना सर्वसमावेशकता, सामाजिक न्याय, पर्यावरणपूरकता आणि सामान्य माणसाचे हित यांना प्राधान्य देणारी नैतिक दिशा असणे आवश्यक आहे. स्थानिक ज्ञान, स्थानिक समूहांचा सहभाग आणि विकेंद्रित निर्णयप्रक्रिया यांतून अधिक टिकाऊ व लोकाभिमुख अर्थव्यवस्था उभी राहू शकते. रानडे यांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचे आजच्या संदर्भात पुनर्मूल्यांकन करून भारतीय परिस्थितीला अनुरूप, सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणारी आणि सार्वजनिक हिताला प्राधान्य देणारी पर्यायी आर्थिक धोरणात्मक चौकट विकसित करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तत्पूर्वी, ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी महाराष्ट्रातील समाजप्रबोधनाची परंपरा आणि त्यातून उभ्या राहिलेल्या सामाजिक चळवळींमध्ये रानडे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. विवेकाच्या आधारे आणि उत्क्रांतीच्या मार्गाने परिवर्तन घडविण्यावर त्यांचा भर होता. सुधारणा केवळ विचार मांडून घडत नाहीत, तर स्वतःपासून सुरुवात करून समाजात सातत्याने आणि संयमाने परिवर्तन घडवावे लागते, हा रानडे यांच्या विचारांचा महत्त्वपूर्ण संदेश असल्याचे बेडकीहाळ यांनी अधोरेखित केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 NOV 2026 जनप्रवास

सदाचार हाच न्यायमूर्ती रानडे यांच्या धर्मविचारांचा मूलाधार : डॉ. चौसाळकर

जनप्रवास : कोल्हापूर

सदाचार हाच न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या धर्मविचारांचा मूलाधार असून, आधुनिक काळात धर्माचरणाइतकीच नागरिकत्वाची कर्तव्ये महत्त्वाची आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपली सामाजिक आणि राष्ट्रीय कर्तव्ये निष्ठेने पार पाडली पाहिजेत, असे न्या. रानडे यांचे मत होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'महादेव गोविंद रानडेः काळ आणि कर्तृत्व' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेच्या समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून 'न्या. रानडे यांचे धर्मविचार' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ



विचारवंत किशोर बेडकीहाळ होते. डॉ. चौसाळकर म्हणाले, रानडे यांचा धर्मविचार हा केवळ ईश्वरभक्ती किंवा पारलौकिक मुक्तीच्या संकल्पनेपुरता मर्यादित नव्हता, तर तो मानवी जीवनाच्या सर्वांगीण उन्नयनाशी आणि समाजकल्याणाशी जोडलेला होता. सुख-दुःख हे जीवनाचे अविभाज्य भाग असून, मनाची स्थिरता आणि चित्तशुद्धी राखत दुःखाचा सामना करणे तसेच प्राप्त झालेले सुख आणि समृद्धी इतरांसोबत वाटून घेणे, हे जीवनाचे खरे मर्म असल्याचे रानडे मानत. जीवनात सदाचाराने वागणे, माणसाचे अधिकाधिक उन्नयन घडविणे आणि आधुनिक राष्ट्रातील नागरिक म्हणून आपली कर्तव्ये पार पाडणे, हाच रानडे यांच्या धर्मविचारांचा व्यापक आणि आजच्या काळातही मार्गदर्शक ठरणारा आशय आहे. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत केले. राजवर्धन गुरव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अरुण भोसले, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नागोराव कुंभार, डॉ. नीरज हातेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. देवकुमार अहिरे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. सूर्यकांत गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज
05 NOV 2026



शिवाजी विद्यापीठात संगीत वाद्यांची दुरुस्ती व मूलभूत देखभाल कार्यशाळेचे यशस्वी आयोजन

कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि कल्चरल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संगीत वाद्यांची दुरुस्ती व मूलभूत देखभाल ही प्रात्यक्षिक कार्यशाळा नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. २ आणि ३ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिविभागाच्या छोट्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेसाठी पुण्यातील ज्येष्ठ वाद्यनिर्माते आणि वाद्यदुरुस्ती क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ श्री. हेमकांत नावडीकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तानपुरा, तबला आणि हार्मोनिअम यांसारख्या विविध भारतीय शास्त्रीय वाद्यांची दुरुस्ती, त्यांची देखभाल, जवारी काढणे , तबला ओढ काढणे, हार्मोनिअम ट्यूनिंग करणे याविषयीचे सखोल प्रात्यक्षिक श्री. नवडीकर यांनी विद्यार्थ्यांना दिले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, ''संगीत क्षेत्रात वादन व गायनाइतकेच वाद्यांची निगा राखणे आणि त्यांची दुरुस्ती समजणे हेही कलाकारासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना केवळ तात्विक ज्ञान न मिळता प्रत्यक्ष वाद्य दुरुस्तीचे कौशल्याधारित शिक्षण मिळाले पाहिजे.'' श्री. नावडीकर यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीतातील रागांचे ज्ञान खेळातून व्हावे या दृष्टिकोनातून तयार केलेल्या 'सूर ताश' या पत्त्यांच्या खेळाचेही यावेळी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्व उपस्थित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.


या दोन दिवसीय कार्यशाळेला अधिविभागातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापकांची उपस्थिती लाभली. कार्यशाळेचे प्रास्ताविक अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. तर आभार सौ. देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रशांत देसाई व गिरीधर कुलकर्णी यांनी केले.

05 NOV 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वर्तमान

शिवाजी विद्यापीठात 'संगीत वाद्यांची दुरुस्ती व मूलभूत देखभाल' कार्यशाळेचे यशस्वी आयोजन



कोल्हापूर/प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग आणि 'कल्चरल क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'संगीत वाद्यांची दुरुस्ती व मूलभूत देखभाल' ही प्रात्यक्षिक कार्यशाळा नुकतीच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. २ आणि ३ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिविभागाच्या छोट्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी पुण्यातील ज्येष्ठ वाद्यनिर्माते आणि वाद्यदुरुस्ती क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञ श्री. हेमकांत नावडीकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तानपुरा, तबला आणि हार्मोनिअम यांसारख्या विविध भारतीय शास्त्रीय वाद्यांची दुरुस्ती, त्यांची देखभाल, जवारी काढणे , तबला ओढ काढणे, हार्मोनिअम ट्यूनिंग करणे याविषयीचे सखोल प्रात्यक्षिक श्री. नवडीकर यांनी विद्यार्थ्यांना दिले.

यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, 'संगीत क्षेत्रात वादन व गायनाइतकेच वाद्यांची निगा राखणे आणि त्यांची दुरुस्ती समजणे हेही कलाकारासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना केवळ तात्विक ज्ञान न मिळता प्रत्यक्ष वाद्य दुरुस्तीचे कौशल्याधारित शिक्षण मिळाले पाहिजे.' श्री. नावडीकर यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीतातील रागांचे ज्ञान खेळातून व्हावे या दृष्टिकोनातून तयार केलेल्या 'सूर ताश' या पत्त्यांच्या खेळाचेही यावेळी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्व उपस्थित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या दोन दिवसीय कार्यशाळेला अधिविभागातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापकांची उपस्थिती लाभली. कार्यशाळेचे प्रास्ताविक अधिविभाग प्र

मुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. तर आभार सौ. देशपांडे यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रशांत देसाई व गिरीधर कुलकर्णी यांनी केले.

05 NOV 2026
सकाळ

शिवाजी विद्यापीठाची उद्या 'सिनेट'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेची (सिनेट) बैठक शुक्रवारी (ता. ६) होणार आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता बैठकीला प्रारंभ होईल. यामध्ये मास कॉपी प्रकरण, कायाकिंग स्पर्धांचे आयोजन, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलेल्या तसलमात रक्कम, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य नियुक्ती, कुल सचिवांबाबतचा चौकशी अहवाल आदींवर चर्चा रंगणार आहे.

जनसंपर्क कक्ष
05 NOV 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तलवारबाजी स्पर्धेमध्ये १९ महाविद्यालयांचा सहभाग

इचलकरंजीत शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धा

इचलकरंजी, ता. ४ : येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुष व महिला तलवारबाजी स्पर्धा झाल्या. स्पर्धेत विद्यापीठाशी संलग्न १९ महाविद्यालयांतील ५६ खेळाडूंनी सहभाग घेतला. ईपी, फॉईल आणि सेबर या तीन प्रकारांत खेळाडूंनी कौशल्याचे प्रदर्शन केले.

स्पर्धेचे उद्घाटन डॉ. राजू मगदूम यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डीकेएएससी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

समारोपप्रसंगी दीपक रावळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्यांना पदके देऊन गौरवले. स्पर्धेसाठी डॉ. आर. डी. मगदूम, समीर पठाण आणि अजित पाटील यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. निशिगंधा पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. प्रतिभा पैलवान यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सतीश चव्हाण यांनी आभार मानले.



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय पुरुष व महिला तलवारबाजी स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना पदके प्रदान करून गौरवले.

स्पर्धेचा निकाल

महिला गट

ईपी : वैभवी माने, दिव्यांका कदम (अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय, आष्टा), अपूर्व कळके (महावीर महाविद्यालय, कोल्हापूर), मीनल मकानदार (शिवाजी कॉलेज, गडहिंग्लज).

फॉईल : तनवी कुरडे (वालचंद कॉलेज, सांगली), संजना कांबळे (गडहिंग्लज कॉलेज), सोनाली कांबळे (जयसिंगपूर कॉलेज), रंजना कांबळे (गडहिंग्लज कॉलेज).

सेबर : श्लोका शिंदे, सायली माने (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), श्रेया कुंभार (गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली), भूमिका पाटील (भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर).

पुरुष गट

ईपी : मंथन कांबळे (शिवाजी विद्यापीठ), प्रणव चव्हाण (किसनवीर महाविद्यालय), संतोष ओलेकर (वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय), श्रीवर्धन फटाळे (डीकेएएससी महाविद्यालय).

फॉईल : अथर्व कर्नाळे (गडहिंग्लज कॉलेज), रितेश पोवार (विवेकानंद कॉलेज), भूषण पाटील (शिवाजी विद्यापीठ), आदित्य पाटील.

सेबर : आदित्य अंगल, शिरीष अंगल, श्रीशैल शिंदे, श्रीनिवास पाटील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 NOV 2026

जनप्रवास

आंतर विभागीय तलवारबाजी स्पर्धा उत्साहात

जनप्रवास : इचलकरंजी

श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथे २ व ३ नोव्हेंबर रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या सन २०२६-२७ मधील आंतरविभागीय पुरुष व महिला तलवारबाजी स्पर्धा उत्साहात झाली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या 19 कॉलेजमधून 56 स्पर्धक सहभागी झाले होते. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी माजी सरपंच, माणगाव व नवमहाराष्ट्र सूतगिरणी, साजणीचे अध्यक्ष डॉ. राजू मगदूम, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डी. के. ए. एस. सी. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्र. प्राचार्य डॉ. श्रुती जोशी यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्य आवश्यक असून शारीरिक व मानसिक स्वास्थ्याबरोबरच व्यक्तिमत्व विकासासाठी ती महत्वपूर्ण असल्याचे सांगितले व सर्व



स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. महिला गटातून ईपी तलवारबाजीमध्ये प्रथम वैभवी माने, द्वितीय दिव्यांका कदम, अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी आष्टा, तृतीय अपूर्व कळके महावीर कॉलेज, कोल्हापूर व चतुर्थ मीनल मकानदार शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स डी. एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज यशस्वी झाले. फॉईल तलवारबाजीमध्ये वालचंद कॉलेज, सांगली येथील तनवी कुडे प्रथम, गडहिंग्लज कॉलेज येथील संजना कांबळे द्वितीय, जयसिंगपूर कॉलेजमधील सोनाली कांबळे तृतीय व गडहिंग्लज कॉलेजमधील रंजना कांबळे चतुर्थ क्रमांकाने यशस्वी झाल्या. तर सॅबर तलवारबाजीमध्ये विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील श्लोका शिंदे प्रथम व सायली माने द्वितीय गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली येथील श्रेया कुंभार तृतीय व भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, कोल्हापूर येथील भूमिका पाटील हिने चतुर्थ क्रमांक पटकावत यश संपादन केले.

पुरुष गटातून ईपी तलवारबाजी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील मंथन कांबळे प्रथम किसनवीर महाविद्यालय, वाई येथील प्रणव चव्हाण द्वितीय वालचंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, सांगलीमधील संतोष ओलेकर तृतीय व डी. के. ए. एस. सी. कॉलेज, इचलकरंजी येथील श्रीवर्धन फटाळे याने चतुर्थ क्रमांक पटकावला. फॉईल तलवारबाजीमध्ये गडहिंग्लज कॉलेजमधील अथर्व कर्नाळे प्रथम, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील रितेश पोवार द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील भूषण पाटील तृतीय व आदित्य पाटील यांनी चतुर्थ क्रमांक प्राप्त केला तर सॅबर तलवारबाजी स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील आदित्य अंगल प्रथम; शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील शिरीष अंगल द्वितीय; विवेकानंद कॉलेजमधील श्रीशैल शिंदे तृतीय तर गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली येथील श्रीनिवास पाटील याने चतुर्थ क्रमांक पटकावत यश संपादन केले.

05 NOV 2026
जनप्रवास

पीएचडी परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

- शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द

जनप्रवास : कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पीएच. डी. कोर्सवर्क/ आरपीइअभ्यासक्रमाचे ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२६ (हिवाळी सत्रातील) परीक्षा अर्ज भरावयास मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा संकेतस्थळावर जाहिर झाल्या आहेत. महाविद्यालय किंवा अधिविभागांमध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाचा आहे. तर विनाविलंब शुल्कासह ५ नोव्हेंबरपर्यंत महाविद्यालय व अधिविभागांती बॅच पाडायचे आहेत. विलंब शुल्कासह व ११ नोव्हेंबर, अतिविलंब शुल्कासह ७ ते १२ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरावयाचे आहेत. विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची जामा झालेली रक्कम विनाविलंब शुल्कासह ६ नोव्हेंबर, विलंब शुल्कासह ७ नोवेंबर तर अतिविलंब शुल्कासह १३ नोव्हेंबरपर्यंत जमा करावयाची आहे.